राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा (राज्यसेवा/अभियांत्रिकी/कृषीसेवा/वनसेवा), राज्यसेवा मुख्य परीक्षा, अराजपत्रित गट ब व क संयुक्त पूर्व व मुख्य परीक्षा (PSI/STI/ASO/SR/II/EX.SI/TAX ASST/CLERK/TECH.ASST/AMVI) तसेच इतर सर्व सरळसेवा परीक्षा व स्पर्धा परिक्षांकरिता उपयुक्त

भगीरथ ® प्रकाशन, पुणे

UPSC / MPSC

# भारतीय राज्यघटना व प्रशासन

# परिपूर्ण Revision Notes



PYQs मधील IMP Facts
व चालू घडामोडींचा समावेश

भगीरथ IAS Academy UPSC • MPSC

By RANJAN KOLAMBE


Bhagirath IAS Academy
भगीरथ IAS Academy UPSC • MPSC
भगीरथ प्रकाशन, पुणे
भारतीय राज्यघटना आणि प्रशासन
Original Book
भारतीय राज्यघटना आणि प्रशासन
परिपूर्ण Revision Notes
IAS, राज्यसेवा पूर्व व मुख्य परीक्षा, PSI / STI / ASO
तसेच इतर स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त....
UPSC/ MPSC
भारताची राज्यघटना आणि प्रशासन
BY RANJAN KOLAMBE
+
UPSC / MPSC
भारतीय राज्यघटना व प्रशासन
परिपूर्ण
Revision Notes
By RANJAN KOLAMBE
=
विषयच संपला!!!
100% GUARANTEED
THE BEST CHOICE
99702 98197
909090 6777

MPSC राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा (राज्यसेवा/अभियांत्रिकी/कृषीसेवा/वनसेवा),
राज्यसेवा मुख्य परीक्षा, अराजपत्रित गट ब व क संयुक्त पूर्व व मुख्य परीक्षा
(PSI/STI/ASO/SR/II/EX.SI/TAX ASST/CLERK/TECH.ASST/AMVI)
तसेच इतर सर्व सरळसेवा परीक्षा व स्पर्धा परिक्षांकरिता उपयुक्त

# भारतीय राज्यघटना व प्रशासन

## परिपूर्ण Revision Notes

By

Ranjan Kolambe

भगीरथ IAS Academy UPSC • MPSC
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

भगीरथ प्रकाशन, पुणे

# भारतीय
# राज्यघटना व प्रशासन
## परिपूर्ण
# Revision Notes


✻ लेखक ✻

श्री.रंजन कोळंबे



सर्व हक्क © : लेखकाधिन



✻ प्रकाशक ✻

सौ. पूनम पाटील कोळंबे

भगीरथ प्रकाशन

महाश्वेता बुक सेंटर

शॉप क्र. १,२,३,४ सी-विंग, मंत्री हाईट्स,

दक्षिण मुखी मारूती मंदिराजवळ, शनिवार पेठ, अप्पा बळवंत चौकाजवळ, पुणे.

फोन : ९७६३०४६९५८ (पुस्तकांच्या ऑर्डरसाठी संपर्क)

✻ प्रथमावृत्ती ✻

मे २०२४



सदरील पुस्तकाचे पुनर्मुद्रण करण्याचे सर्व अधिकार 'कॉपिराईट कायदा, १९५७' अन्वये लेखकाधिन आहेत. त्यानुसार या पुस्तकाचे तसेच यातील कोणत्याही भागाचे किंवा घटकाचे किंवा परिच्छेदाचे किंवा तक्त्याचे कोणत्याही पद्धतीने (स्कॅनिंग करून, छापून, फोटोकॉपी / झेरॉक्स करून इत्यादी) पुनर्मुद्रण केल्यास सदरिल व्यक्ती अथवा संस्थेवर कॉपिराईट कायदा, १९५७ नुसार योग्य ती कारवाई केली जाईल.

# 1 घटना निर्मिती

## भारतासाठी संविधान सभेची मागणी

**संविधान सभा म्हणजे काय?** → सार्वभौम लोकशाही देशाची घटना तयार करण्याचे कार्य पार पाडणारी लोकांची प्रतिनिधिक संस्था.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | १९२२ | **महात्मा गांधी** | 'संविधान सभा' असा शब्दोल्लेख न करता अशा सभेची मागणी केली. |
| 2. | १९३४ | **मानवेंद्रनाथ रॉय** | भारतासाठी संविधान सभेची कल्पना सर्वप्रथम मांडली. ते भारतातील साम्यवादी चळवळीचे अग्रणी होते. |
| 3. | डिसेंबर १९३४ | **काँग्रेस** | **काँग्रेसने पहिल्यांदाच संविधान सभेची औपचारिक मागणी केली** → ५-७ डिसेंबर, १९३४ दरम्यान पाटणा येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकारीणीच्या बैठकीत. |
| 4. | १९३८ | **जवाहरलाल नेहरू** | स्वतंत्र भारताची घटना प्रौढ मतदानाद्वारे निवडण्यात आलेल्या संविधान सभेद्वारे कोणत्याही बाह्य प्रभावाविना तयार करण्यात यावी. |
| 5. | १९४० | **लॉर्ड लिनलिथगो** | यांच्या **'ऑगस्ट ऑफर'** द्वारे ब्रिटिश सरकारने पहिल्यांदाच भारताची घटना 'मुख्यत:' भारतीयांनी तयार करावी, हे तत्व मान्य केले. |
| 6. | १९४२ | **सर स्टॅफर्ड क्रिप्स** | यांच्या तरतुदींमध्ये, भारताची घटना 'पूर्णत:' भारतीयांनी तयार करावी, हे तत्व मान्य करण्यात आले. |
| 7. | मे १९४६ | **कॅबिनेट मिशन प्लॅन** | **१९४६ मध्ये** जाहीर करण्यात आलेल्या **'कॅबिनेट मिशन प्लॅन'** मध्ये संविधान सभेच्या निर्मितीची तरतूद करण्यात आली. |

## संविधान सभेची निर्मिती व रचना

- कॅबिनेट मिशन प्लॅन (त्रिमंत्री योजना) मधील तरतुदींमध्ये संविधान सभेची रचना पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली.



<table>
<tr><td rowspan="7">निवडणुका</td><td colspan="3">२९६ जागांसाठी निवडणुका जुलै–ऑगस्ट १९४६ मध्ये घेण्यात आल्या.</td></tr>
<tr><td colspan="2">२९६ जागांपैकी →</td><td>९३ जागा</td></tr>
<tr><td>काँग्रेस</td><td>२०८ जागा मिळाल्या</td><td rowspan="5">संस्थानिकांनी संविधान सभेत भाग न घेण्याचा निर्णय घेतला.</td></tr>
<tr><td>मुस्लिम लिग</td><td>७३ जागा मिळाल्या.</td></tr>
<tr><td rowspan="2">उर्वरित १५ जागा</td><td>प्रत्येकी एक जागा युनियनिस्ट पार्टी, युनियनिस्ट मुस्लिम, युनियनिस्ट शेड्यूल्ड कास्ट, कृषक प्रजा पार्टी, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, शिख (गैर–काँग्रेस), आणि कम्युनिस्ट या पक्षांना मिळाली.</td></tr>
<tr><td>८ जागा अपक्षांना मिळाल्या.</td></tr>
<tr><td colspan="2">■ निवडणूका जरी प्रत्यक्ष प्रौढ मतदानाच्या आधारावर घेण्यात आल्या नाही, तरी भारतीय समाजाच्या सर्व गटांना प्रतिनिधित्व मिळाले: हिंदू, मुस्लिम, शिख, पारसी, ॲंग्लो–इंडियन, भारतीय ख्रिश्चन, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला इत्यादी.<br>■ तत्कालिन भारतातील जवळजवळ सर्व प्रसिद्ध व अनुभवी व्यक्ती संविधान सभेचे सदस्य बनले. अपवाद: महात्मा गांधी व मुहम्मद अली जीना</td></tr>
<tr><td rowspan="8">संविधान सभेचे काम काज</td><td>९ डिसेंबर, १९४६</td><td colspan="2">■ पहिली बैठक न्यू दिल्ली येथील ‘कॉन्स्टिट्युशन हॉल’मध्ये (सध्याचा ‘सेंट्रल हॉल ऑफ पार्लमेंट हाऊस’)<br>■ २०७ सदस्य हजर (मुस्लिम लीग व संस्थानिकांचे प्रतिनिधी गैरहजर)<br>■ तात्पुरते अध्यक्ष→ डॉ.सच्चिदानंद सिन्हा (संविधान सभेचे जेष्ठतम सदस्य, फ्रान्सच्या पद्धतीचे अनुसरण) त्यांच्या नावाची शिफारस आचार्य जे.बी.कृपलानी यांनी केली.<br>■ सदिच्छा संदेशांचे वाचन → यु.एस.ए., चीन आणि ऑस्ट्रेलिया या देशांकडून आलेल्या<br>■ तात्पुरते उपाध्यक्ष → फ्रँक ॲन्थनी<br>■ हजर असलेल्या २०७ सदस्यांनी आपल्या योग्यता सादर केल्या. त्यांमध्ये ९ महिला होत्या.</td></tr>
<tr><td>११ डिसेंबर, १९४६</td><td colspan="2">■ डॉ.राजेंद्र प्रसाद → संविधान सभेचे कायमस्वरूपी अध्यक्ष म्हणून निवड → त्यांच्या नावाची शिफारस जे.बी. कृपलानी यांनी, तर त्यास अनुमोदन वल्लभभाई पटेल यांनी दिले.<br>■ सर बी.एन.राव → संविधान सभेचे कायदेशीर घटनात्मक सल्लागार म्हणून नेमणूक (ते संविधान सभेचे सदस्य नव्हते.)</td></tr>
<tr><td>१३ डिसेंबर, १९४६</td><td colspan="2">■ जवाहरलाल नेहरू यांनी ‘उद्देश पत्रिका’ (Objectives Resolution) मांडली → घटनात्मक संरचनेची मूलतत्वे व तत्वज्ञान समाविष्ट.</td></tr>
<tr><td>२२ जानेवारी, १९४७</td><td colspan="2">■ संविधान सभेने आपल्या दुसऱ्या सत्रात उद्देश पत्रिकेचा स्विकार केला. घटनेची प्रास्ताविका/सरनामा तिच्यावरूनच तयार करण्यात आलेला आहे.</td></tr>
<tr><td>२५ जानेवारी १९४७</td><td colspan="2">■ एच.सी.मुखर्जी (हरेंद्र कुमार मुखर्जी) यांची संविधान सभेचे उपाध्यक्ष म्हणून निवड → ते भारतीय ख्रिश्चन समुदायाचे प्रतिनिधी होते.</td></tr>
<tr><td>१६ जुलै, १९४७</td><td colspan="2">■ दोन उपाध्यक्षांची निवड → १.एच.सी. मुखर्जी, आणि २.व्ही.टी. कृष्णमाचारी.</td></tr>
<tr><td>२२ जुलै, १९४७</td><td colspan="2">■ संविधान सभेने भारताचा राष्ट्रीय ध्वज स्विकृत केला. (डिझाईन आंध्र प्रदेशाचे पिंगली वेंकय्या यांनी तयार केले होते.)</td></tr>
<tr><td>मे १९४९</td><td colspan="2">■ संविधान सभेने भारताच्या राष्ट्रकूलाच्या सदस्यात्वाला अनुमोदन दिले.</td></tr>
</table>

# २ भारताच्या घटनेची ठळक वैशिष्ट्ये

**सर्वात मोठी लिखित घटना**

| | |
|---|---|
| भारताची घटना | ■ जगातील सर्व लिखित घटनांपैकी सर्वात मोठी घटना आहे.<br>■ सर्वसमावेशक, विस्तृत व तपशीलवार दस्तऐवज आहे.<br>■ १९४९ च्या मूळ घटनेत एक प्रास्ताविका + २२ भाग + ३९५ कलमे + ८ अनुसूच्या होत्या.<br>■ सध्या एक प्रास्ताविका + २५ भाग + ४७० कलमे + १२ अनुसूच्या आहेत. |

■ अमेरिकेच्या घटनेत केवळ ७ कलमे आहेत. १९५० च्या सुमारास कॅनडाच्या घटनेत १४७, ऑस्ट्रेलियाच्या घटनेत १२८, तर दक्षिण आफ्रिकेच्या घटनेत १५३ कलमे होती.

| **घटनेत समाविष्ट नवीन भाग व अनुसूच्या** | | |
|---|---|---|
| भाग VII | ७ वी घटनादुरूस्ती, १९५६ अन्वये वगळण्यात आला.(एकूण २० कलमे वगळण्यात आली) | |
| भाग IV-A | ४२ वी घटनादुरूस्ती, १९७६ अन्वये समाविष्ट | मूलभूत कर्तव्ये |
| भाग IX-A | ७४ वी घटनादुरूस्ती, १९९२ अन्वये समाविष्ट | नगरपालिका |
| भाग IXB | ९७ वी घटनादुरूस्ती, २०११ अन्वये समाविष्ट | सहकारी सोसायट्या |
| भाग XIV | ४२ वी घटनादुरूस्ती, १९७६ अन्वये समाविष्ट | न्यायाधिकरणे |
| अनुसूची IX | पहिली घटनादुरूस्ती, १९५१ अन्वये समाविष्ट | जमिनसुधारणा |
| अनुसूची X | ५२ वी घटनादुरूस्ती, १९८५ अन्वये समाविष्ट | पक्षांतरबंदी |
| अनुसूची XI | ७३ वी घटनादुरूस्ती, १९९२ अन्वये समाविष्ट | पंचायत राज |
| अनुसूची XII | ७४ वी घटनादुरूस्ती, १९९२ अन्वये समाविष्ट | नगरपालिका |

**विविध स्त्रोतांपासून तयार करण्यात आलेली घटना**

■ घटनेत सुमारे ६० देशांच्या घटनेचा विचार करून महत्वाच्या तरतुदींचा समावेश

| | | | |
|---|---|---|---|
| **घटनेचा** | 1. | **संरचनात्मक भाग** | भारतीय शासनाचा कायदा, १९३५ वर आधारित → सुमारे ७५ टक्के भाग/सुमारे २५० तरतुदी त्यातून |
| | 2. | **तात्विक भाग** | मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे अनुक्रमे अमेरिकन व आयरिश घटनांवर आधारित. |
| | 3. | **राजकीय भाग** | संसदीय शासनव्यवस्थेची तत्वे ब्रिटनच्या घटनेवर आधारित. |
| **टिका** | ■ उसनी घटना, ठिगळांचे कार्य, पश्चिमेचे अनुकरण, तिच्यामध्ये नवीन व नाविन्यपूर्ण असे काही नाही इत्यादी.<br>■ मात्र, ही टिका अन्याय्य व अतार्किक → 'ठिगळांचे कार्य' असले तरी 'सुंदर ठिगळांचे कार्य' आहे. | | |

**भारताच्या घटनेचे स्त्रोत**

| १. भारतीय शासन कायदा, १९३५ | २. ब्रिटिश घटना: | ३. युएसए ची घटना: |
|---|---|---|
| ■ संघराज्यीय योजना<br>■ न्यायव्यवस्था,<br>■ लोक सेवा आयोग<br>■ आणीबाणीच्या तरतुदी<br>■ राज्यपालाचे पद<br>■ प्रशासकीय तपशील इत्यादी. | ■ संसदीय शासन व्यवस्था<br>■ कॅबिनेट व्यवस्था<br>■ द्विगृही संसद<br>■ फर्स्ट- पास्ट- पोस्ट-सिस्टिम<br>■ कायदा करण्याची पद्धत<br>■ कायद्याचे राज्य<br>■ एकच नागरिकत्व<br>■ संसदीय विशेषाधिकार. | ■ मूलभूत हक्क<br>■ उपराष्ट्रपती हे पद<br>■ न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य<br>■ न्यायिक पुनर्विलोकन<br>■ राष्ट्रपतींवरील महाभियोगाची पद्धत<br>■ सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशासपदावरून दूर करण्याची पद्धत. |

# ३ भारतीय संघराज्यीय व्यवस्था

<table>
<tr><td rowspan="2">शासनपद्धतींचे प्रकार</td><td>१.<br>एकात्मक शासनपद्धती</td><td>■ सर्व सत्ता राष्ट्रीय सरकारच्या हातात एकवटलेली असते,<br>■ प्रादेशिक सरकारे असल्यास त्यांना राष्ट्रीय शासनाकडून अधिकार प्राप्त होतात.<br>उदा. ब्रिटन, फ्रान्स, जपान, चीन, इटली, बेल्जियम, नॉर्वे, स्विडन, स्पेन इत्यादी</td></tr>
<tr><td>२.<br>संघराज्यात्मक शासनपद्धती</td><td>■ अधिकारांची विभागणी राष्ट्रीय सरकार आणि प्रादेशिक सरकारे यांमध्ये केलेली असते.<br>■ दोन्ही प्रकारची सरकारे आपापल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्रपणे कार्य करीत असतात.<br>उदा. युएसए, स्वित्झरलँड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, रशिया, ब्राझिल, अर्जेन्टिना इत्यादी<br>■ राष्ट्रीय सरकारला संघराज्य (federal) किंवा केंद्र (Central) किंवा संघ (Union) सरकार असे संबोधले जाते,<br>■ प्रादेशिक सरकारांना वेगवेगळ्या नावांनी संबोधले जाते.<br>उदा. युएसएमध्ये ‘राज्ये’ (states), स्वित्झरलँडमध्ये ‘कॅन्टॉन्स’ (cantons), रशियामध्ये ‘गणराज्ये’ (republics), कॅनडामध्ये ‘प्रांत’ (provinces) इत्यादी.</td></tr>
<tr><td rowspan="2">संघराज्याची निर्मिती दोन प्रकारे</td><td>१.<br>एकात्मिकरणाद्वारे</td><td>■ लष्करीदृष्ट्या दुर्बळ किंवा आर्थिकदृष्ट्या मागासलेले स्वतंत्र देश एकत्र येऊन एक मोठा व मजबूत संघराज्य स्थापन करू शकतात.<br>उदा. युएसए. ते १७८७ साली स्थापन झालेले जगातले पहिले व सर्वात जुने संघराज्य आहे. युएसएला संघराज्याचे मॉडेल समजले जाते.</td></tr>
<tr><td>२.<br>विघटनाद्वारेः</td><td>■ एका मोठ्या एकात्मक राष्ट्रात प्रांतांना स्वायत्तता प्रदान केल्यास ते संघराज्यात परिवर्तीत होऊ शकते.<br>उदा. कॅनडाचे संघराज्य १८६७ मध्ये अस्तित्वात आले. त्यामध्ये आज १० प्रांतांचा समावेश आहे.</td></tr>
<tr><td rowspan="2">भारताची शासनव्यवस्था</td><td>भारतीय राज्यघटनेने</td><td>■ देशासाठी संघराज्यात्मक शासनपद्धतीची तरतूद करण्यात आली आहे.<br><table><tr><td rowspan="2">दोन कारणांमुळे</td><td>१) देशाचा मोठा आकार, व</td></tr><tr><td>२ )देशातील सामाजिक-सांस्कृतिक विविधता.</td></tr></table>■ मात्र, घटनेमध्ये भारताचे वर्णन ‘संघराज्य’ (federation) असे केलेले नाही, तर कलम १ मध्ये ‘राज्यांचा संघ’ (Union of States) असे केलेले आहे.</td></tr>
<tr><td>आधार</td><td>■ भारताची संघराज्य व्यवस्था ही ‘अमेरिकन मॉडेल’ वर आधारित नसून ‘कॅनडाच्या मॉडेल’ वर आधारित आहे.<br><table><tr><td rowspan="3">साम्य</td><td>१) निर्मिती पद्धत (विघटनाद्वारे),</td></tr><tr><td>२) कॅनडाप्रमाणेच ‘राज्यांचा संघ’ या संज्ञेचा प्रयोग, आणि</td></tr><tr><td>३)केंद्रीकरणाची प्रवृत्ती</td></tr></table></td></tr>
</table>

# ४ प्रास्ताविका

## प्रास्ताविका

- **अर्थ:** घटनेची प्रस्तावना/सार/सारांश
- **इतर शब्द:** सरनामा/उद्देशिका
- **प्रथम वापर:** अमेरिकन घटनेमध्ये
- नानी पालखीवाला यांनी प्रास्ताविकेला 'घटनेचे ओळख पत्र' असे संबोधले आहे.
- **आधार:** पंडित नेहरूंनी तयार केलेल्या व मांडलेल्या 'उद्देश पत्रिके'वर आधारित आहे.
- **उद्देश पत्रिका:** नेहरूंनी १३ डिसेंबर, १९४६ रोजी मांडली, तर संविधान सभेने २२ जानेवारी, १९४७ रोजी स्विकृत केली.
- प्रास्ताविका घटनेची प्रस्तावना असली तरी संपूर्ण घटना तयार झाल्यानंतर अधिनियमित करण्यात आली.
- आतापर्यंत एकदाच बदल: ४२/१९७६ मध्ये समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि एकात्मता हे शब्द समाविष्ट



**भारताचे संविधान**

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

| प्रास्ताविकेचे घटक | | |
|---|---|---|
| | १. **घटनेच्या प्राधिकाराचा स्त्रोत:** | भारतीय जनता (सुरुवातीचे शब्द 'आम्ही, भारताचे लोक' (We, the People) अमेरिकेच्या घटनेतील प्रास्ताविकेवरून घेण्यात आले आहेत..) |
| | २. **भारतीय राज्याचे स्वरूप/आदर्श:** | सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही व गणराज्य हे भारतीय जनतेने स्वत:साठी स्विकारलेले आदर्श (ideals) आहेत. |
| | ३. **घटनेचे उद्देश/आकांक्षा:** | न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता हे शब्द भारतीय जनतेच्या आकांक्षा (aspirations) स्पष्ट करतात. |
| | ४. **घटनेची स्विकृती:** | २६ नोव्हेंबर, १९४९ ही घटनेच्या स्विकृतीची तारीख प्रास्ताविकेत दिली आहे. (घटनेचा अंमल मात्र २६ जानेवारी, १९५० पासून सुरू झाला.) |

## प्रास्ताविकेचे तत्वज्ञान

**सार्वभौम**

- **अर्थ:** सार्वभौम म्हणजे कोणत्याही बाह्य शक्तींचा प्रभाव नसणे.
- भारत सार्वभौम आहे म्हणजे भारत स्वतंत्र असून त्यावर कोणत्याही परकीय सत्तेचे अधिपत्य नाही. त्यामुळे भारत आपले अंतर्गत व बाह्य कारभार स्वत: करण्यास मुक्त व सक्षम आहे.
- सार्वभौम या शब्दात परकीय प्रदेश मिळविण्याचा किंवा स्वत:चा प्रदेश परकीय शक्तीस बहाल करण्याचा अधिकारही समाविष्ट आहे.
- राष्ट्रकूल, संयुक्त राष्ट्र यांसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्यत्व स्विकारणे म्हणजे सार्वभौमत्वाचा लोप होतो, असे होत नाही.

# ८ संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र

## संघराज्य व राज्यक्षेत्र (भाग I / कलम १ ते ४)

**कलमे**
- १ : संघराज्याचे नाव व राज्यक्षेत्र
- २ : नवीन राज्ये दाखल/स्थापन करणे
- ३ : नवीन राज्याची निर्मिती
- ४ : ३६८ अंतर्गत घ.दु. नाही

**कलम १** — **संघराज्याचे नाव व राज्यक्षेत्र**

| | |
|---|---|
| **कलम १(१)** | इंडिया, अर्थात भारत, हा राज्यांचा संघ असेल. |
| **कलम १(२)** | घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांची नावे आणि त्यांचे राज्यक्षेत्र पहिल्या अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे असेल. |
| **कलम १(३)** | भारताचे राज्यक्षेत्र (territory) पुढील बाबींचे मिळून बनलेले असेल:<br>1. घटकराज्यांची राज्यक्षेत्रे,<br>2. केंद्रशासित प्रदेश, आणि<br>3. संपादित केली जातील अशी अन्य राज्यक्षेत्रे. |

**कलम १ च्या तरतुदींवरुन पुढील अर्थ निघतात:**

| | |
|---|---|
| **भारताचे वर्णन** | संघराज्य असे न करता 'राज्यांचा संघ' असे करण्यात आले आहे. |
| **घटनेच्या तरतुदी** | सर्व राज्यांना सारख्याच प्रमाणात लागू आहेत |
| **अपवाद** | 1. पूर्वी जम्मू व काश्मिरला विशेष दर्जा होता (५ ऑगस्ट, २०१९ रोजी राष्ट्रपतींच्या ठरावाद्वारे रद्द)<br>2. भाग XXI → १२ राज्यांसाठी काही विशेष तरतुदी → महाराष्ट्र, गुजराथ, नागालँड, आसाम, मणिपूर, आंध्रप्रदेश, सिक्किम, मिझोरम, अरूणाचल प्रदेश, गोवा आणि कर्नाटक<br>3. V वी अनुसूची → आसाम, मेघालय, त्रिपुरा व मिझोरम वगळता इतर राज्यांमधील अनुसूचित क्षेत्रांच्या प्रशासनाविषयी स्वतंत्र तरतुदी<br>४. VI वी अनुसूची → आसाम, मेघालय, त्रिपुरा व मिझोरम या राज्यांतील आदिवासी क्षेत्रांच्या प्रशासनाविषयी स्वतंत्र तरतुदी. |
| **भारताचे राज्यक्षेत्र व भारताचा संघ यांमधील फरक** | **भारताचे राज्यक्षेत्र**: घटकराज्ये + केंद्रशासित प्रदेश + भविष्यात संपादित केली जातील असे प्रदेश<br>**भारताचा संघ**: राज्यांचा संघ = केवळ घटकराज्यांचा समावेश |
| **भारत सार्वभौम देश असल्याने** | **आंतरराष्ट्रीय कायद्याने संमत पद्धतींद्वारे परकीय प्रदेशाचे संपादन करू शकतो.**<br>**उदा.**<br>● तह, खरेदी, देणगी, भाडेपट्टी करार, सार्वमत यांद्वारे (cession), किंवा<br>● आतापर्यंत कोणीही हक्क न सांगितलेला प्रदेश ताब्यात घेणे (occupation),<br>● एखादा प्रदेश जिंकून घेणे (conquest) इत्यादी.<br>**उदा.**<br>● भारताने दादरा व नगरहवेली, गोवा, दमण व दीव, पुदुचेरी आणि सिक्किम हे प्रदेश संपादित केलेले आहेत. |

# ६ नागरिकत्व

**अर्थ** — नागरिकत्व म्हणजे राज्यसंस्थेचे सदस्यत्व, नागरिकांना सर्व नागरी व राजकीय हक्क प्राप्त होतात.

**नागरिक व परकीय यांमधील फरक**

**निवासी**

**नागरिक**
- राज्यसंस्थेचे पूर्ण सदस्य असतात.
- आपली निष्ठा बहाल करतात
- त्यांना सर्व नागरी व राजकीय हक्क प्राप्त होतात.

**केवळ नागरिकांना प्राप्त हक्क व विशेष अधिकार**
- **काही मूलभूत हक्क – कलम** १५, १६, १९, २९ व ३०
- लोकसभा व विधानसभा निवडणूकांमध्ये मतदान करण्याचा हक्क.
- काही सार्वजनिक पदे धारण करण्याचा हक्क.– उदा. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल, SC/HCs चे न्यायाधीश, CAG इ.
- **संसद व राज्य विधानमंडळ** यांचे सदस्यत्व (राष्ट्रपती पदासाठी केवळ जन्म तत्त्वाद्वारे नागरिक असलेला व्यक्ती पात्र)

**परकीय**
- भारतात तात्पुरत्या वास्तव्यासाठी आलेले आणि सर्व राजकीय हक्क नसलेले व्यक्ती
- त्यांना सर्व नागरी व राजकीय हक्क प्राप्त होत नाहीत.

**मित्र परकीय–**
- भारताशी सलोख्याचे संबंध असलेल्या देशांचे नागरिक

**शत्रू परकीय**
- भारताशी युद्धरत असलेल्या देशाचे नागरिक

## भाग II – कलम ५ ते कलम ११

### घटनेच्या प्रारंभीचे नागरिकत्व

**कलम ५** — **घटनेच्या प्रारंभीचे नागरिकत्व (अधिवासाच्या आधारावर)**
- व्यक्ती भारताच्या राज्यक्षेत्रात जन्मली असेल तर, **किंवा**
- व्यक्तीच्या माता पित्यापैकी कोणीही एक भारताच्या राज्यक्षेत्रात जन्मले असेल तर, **किंवा**
- घटना लागू होण्यापूर्वी किमान पाच वर्षे भारताच्या राज्यक्षेत्रात निवासी असेल तर

**कलम ६** — **पाकिस्तानातून स्थलांतरितांचे नागरिकत्व**

**अ)** व्यक्ती किंवा व्यक्तीच्या माता-पित्यापैकी किंवा तिच्या आजी आजोबांपैकी कोणाही एकाचा भारतात जन्म झालेला असेल तर **आणि**

**ब)** i) अशा व्यक्तीने १९, जुलै १९४८ पूर्व स्थलांतर केले असेल व तेव्हापासून भारतात निवासी असेल तर **किंवा**

ii) अशा व्यक्तीने १९, जुलै १९४८ नंतर स्थलांतर केले असेल व घटनेच्या प्रारंभापूर्वी सक्षम अधिकाऱ्याकडे अर्ज करून नागरिक म्हणून नोंदणी केली असेल तर (मात्र अर्ज करण्यापूर्वी तो भारतात सलग ६ महिने निवासी असावा)

| | |
|---|---|
| **कलम ७** | **स्थलांतर करुन पाकिस्तानात गेलेल्या व्यक्तींचे नागरिकत्व**<br>१ मार्च १९४७ नंतर पाकिस्तानात स्थलांतरित व्यक्ती कायदेशीर परवान्याखाली पुन्हा स्थायिक होण्यासाठी **किंवा** कायमचे परत येण्यासाठी भारतात परतली असेल तर (१९ जुलै, १९४८ नंतर भारतात स्थलांतर केले असल्याचे मानले जाईल.) |
| **कलम ८** | **मूळचे भारतीय मात्र भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तींचे नागरिकत्व**<br>■ अशा व्यक्तीने ती राहत असलेल्या देशातील भारताच्या राजदौतिक (Diplomatic) किंवा वाणिज्यदौतिक (Consular) प्रतिनिधीकडे घटनेच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर केलेल्या अर्जावरून भारताची नागरिक म्हणून नोंदणी केली असेल तर |
| **कलम ९** | कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही परकीय देशाचे नागरिकत्व स्वेच्छेने स्वीकारल्यास ती भारताची नागरिक असणार नाही. |
| **कलम १०** | भारतीय नागरिक असलेली व्यक्ती संसदीय कायद्यांच्या तरतुदींना अधिन राहून नागरिक म्हणून कायम राहिल. |
| **कलम ११** | नागरिकत्वाचे संपादन, समाप्ती व अन्य बाबींसंदर्भात कायदा करण्याचा अधिकार केवळ संसदेला असेल. |

**नागरिकत्व कायदा, १९५५**

**संपादन**
१. जन्म तत्वाद्वारे
२. वंश तत्वाद्वारे
३. नोंदणी तत्वाद्वारे
४. स्विकृती तत्वाद्वारे
५. प्रदेशाच्या समिलिकरणाद्वारे

**समाप्ती**
१. त्याग करणे
२. संपुष्टात येणे
३. काढून घेणे

**नागरिकत्व संपादनाचे मार्ग**

| | | |
|---|---|---|
| **जन्मतत्त्वाद्वारे** | ■ **२६ जानेवारी, १९५०** या दिवशी किंवा त्यानंतर आणि **१ जुलै १९८७** पूर्वी भारतात जन्मलेला व्यक्ती | भारताचा नागरिक असेल. माता-पित्याच्या नागरिकत्वाची अट नसेल. |
| | ■ **१ जुलै, १९८७ या दिवशी** किंवा नंतर भारतात जन्मलेला व्यक्ती | भारताचा नागरिक असेल, जर जन्माच्या वेळी त्याच्या माता-पित्यापैकी कोणीही भारतीय नागरिक असेल तर |
| | ■ ३ डिसेंबर, २००४ या दिवशी किंवा त्यानंतर भारतात जन्मलेला व्यक्ती | भारताचा नागरिक असेल, जर जन्माच्य वेळी त्याचे माता-पिता दोन्हीही किंवा कोणीही एक भारताचा नागरिक असेल आणि दुसरा बेकायदेशीर स्थलांतरीत नसेल तर |
| | ■ भारतात नियुक्ती असणारे परकीय राजदौतिक अधिकारी व शत्रू परकीयांची मुले | यांना जन्म तत्त्वाद्वारे भारतीय नागरिकत्व उपलब्ध नाही. |
| **वंशतत्त्वाद्वारे** | ■ **२६ जानेवारी, १९५०** रोजी किंवा नंतर **मात्र १० डिसेंबर पूर्वी भारताच्या बाहेर जन्मलेली व्यक्ती** | भारतीय नागरिक असेल, जर जन्माच्या वेळी वडील भारतीय नागरिक असतील तर |
| | ■ **१० डिसेंबर १९९२ रोजी** किंवा नंतर भारताच्या बाहेर जन्मलेली व्यक्ती | भारतीय नागरिक असेल, जर जन्माच्या वेळी त्याच्या माता-पित्यांपैकी कोणीही एक भारतीय नागरिक असेल तर |
| | ■ **३ डिसेंबर, २००४ च्या पुढे** भारताच्या बाहेर जन्मलेली व्यक्ती | वंशतत्त्वाने भारतीय नागरिक असणार नाही. परंतु जन्मानंतर एक वर्षाच्या आत किंवा त्यानंतर केंद्र सरकारच्या संमतीने जर त्याच्या जन्माची नोंदणी केली असेल तर नागरिक |

# ७ मूलभूत हक्क

**हक्कांचे प्रकार**

| | |
|---|---|
| **नैसर्गिक हक्क** | निसर्गाने/देवाने दिलेले हक्क (राजा किंवा समाजाने प्रदान न केलेले) |
| **मानवी हक्क** | आपणास मानव म्हणून प्राप्त हक्क |
| **घटनात्मक हक्क** | देशाच्या घटनेने प्रदान केलेले हक्क, सर्व नागरिकांना उपलब्ध नसतात.<br>उदा. कलम ३२६ अंतर्गत मतदानाचा हक्क १८ पेक्षा अधिक वयाच्या व्यक्तींनाच उपलब्ध. |
| **मूलभूत हक्क** | देशाच्या घटनेने प्रदान केलेले व हमी दिलेले हक्क.<br>न्यायप्रविष्ठ असतात. → उल्लंघित झाल्यास थेट SC मध्ये जाण्याची हमी.<br>सर्व सार्वजनिक प्राधिकाऱ्यांवर बंधनकारक असतात. |
| **कायदेशीर हक्क** | सामान्य कायद्याने प्रदान केलेले व हमी दिलेले हक्क. उल्लंघित झाल्यास थेट SC मध्ये जाता येत नाही. |

**भारतीय घटनेतील मूलभूत हक्क**

- घटनेच्या भाग III मध्ये (कलम १२ ते ३५) समाविष्ट.
- भारताची **मॅग्ना कार्टा** म्हणून ओळखली जाते.
- अमेरिकेच्या बील ऑफ राईट्सवर आधारलेले आहेत.
- जगातील इतर कोणत्याही घटनेतील मूलभूत हक्कांपेक्षा अधिक विस्तृत आहेत.
- राजकीय लोकशाहीचा आदर्श प्रस्थापित करतात.

**मूलभूत हक्कांचे महत्व**

1. नागरिकांचा संपूर्ण शारीरिक, मानसिक, नैतिक व अध्यात्मिक विकास सुनिश्चित करतात → जीवन जगण्यायोग्य बनवतात.
2. बहुसंख्यांकांच्या राज्यकारभारासाठी 'लोकशाहीजन्य नितीमान्यते'चा आराखडा निर्माण करतात, त्याचबरोबर अल्पसंख्यांकांमध्ये सुरक्षिततेची भावनाही निर्माण करतात.
3. देशात राजकीय लोकशाहीचा आदर्श प्रस्थापित करतात.
   1.एकाधिकारशाही व जुलमी सत्ता प्रस्थापित होण्यास प्रतिबंध करतात, जनतेच्या स्वातंत्र्यांचे संरक्षण करतात.
   2.कार्यकारी मंडळाच्या जुलुमी कृतींवर आणि कायदेमंडळाच्या असंगत कायद्यांवर मर्यादा घालण्याचे कार्य करतात.
   3.ते 'माणसांचे नव्हे तर कायद्यांचे शासन' प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.

**मूलभूत हक्कांची वैशिष्ट्ये**

| | | |
|---|---|---|
| १. | **घटनेचा अविभाज्य भाग आहेत.** | साधारण कायद्याद्वारे बदलता/रद्द करता येत नाही. त्यासाठी कलम ३६८ मधील घटनादुरूस्तीचाच वापर करावा लागतो. |
| २. | **घटनेचा सर्वात विस्तृत भाग** | इतर देशांच्या मूलभूत हक्कांपेक्षा अधिक विस्तृत व विश्लेषणात्मक आहे. |
| ३. | **ते केवळ नैसर्गिक हक्क नव्हेत** | घटनेत उल्लेख केलेल्या नैसर्गिक हक्कांना मूलभूत हक्क म्हणता येईल.) |
| ४. | **काही हक्क केवळ नागरिकांना उपलब्ध** | उदा. कलम १५, १६, १९, २९ व ३० मधील मूलभूत हक्क. |
| ५. | **नकारात्मक व सकारात्मक हक्क** | **नकारात्मक** → राज्यसंस्थेला एखादी कृती करण्यास प्रतिबंध करतात.<br>उदा. पदव्या रद्द करणे (कलम १८).<br>**सकारात्मक** → जनतेला काही हक्क मिळवून देतात.<br>उदा. स्वातंत्र्य व समानतेचा हक्क. |
| ६. | **मूलभूत हक्क अमर्यादित नाहीत** | ▪ मूलभूत हक्क हे अमर्यादित नसून गुणात्मक आहेत.<br>▪ राज्यसंस्था त्यांच्यावर पर्याप्त मर्यादा घालू शकते.<br>▪ अशा मर्यादा पर्याप्त आहेत की नाही हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयांना आहे. |

| | | |
|---|---|---|
| **मुक्त संचाराचे स्वातंत्र्य** | **भारतीय राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य**<br>● एका राज्यातून → दुसऱ्या राज्यात<br>● राज्याच्या एका भागातून → दुसऱ्या भागात<br>**संचार स्वातंत्र्य**<br>● देशाच्या आत → कलम १९ अंतर्गत<br>● देशाच्या बाहेर → कलम २१ अंतर्गत (जीवनाचा अधिकार) | ■ सामान्य जनतेचे हित संरक्षण - उदा. देहविक्रय करणाऱ्या महिलांच्या संचारावर बंधन (आधार-सार्वजनिक आरोग्य व नैतिकता) संचारबंदी **(सुप्रिम कोर्ट),** एड्सग्रस्त व्यक्तींचा संचारावर बंधन **(मुंबई हायकोर्ट)**<br>■ अनुसुचित जमातींचे हित संरक्षण- आदिवासी क्षेत्रात बाहेरच्या व्यक्तींच्या प्रवेशावर मनाई |
| **वास्तव्याचे स्वातंत्र्य** | ■ भारताच्या राज्यक्षेत्रात कोणत्याही भागात - राहण्याचा व स्थायिक होण्याचे स्वातंत्र<br>१. तात्पुरते राहण्याचा<br>२. कायमस्वरूपी राहण्याचा | ■ सामान्य जनतेचे हित संरक्षण<br>■ देहविक्रय महिला, सराईत गुन्हेगार<br>■ अनुसुचित जातींचे हित संरक्षण |
| **व्यवसायाचे स्वातंत्र्य** | ■ कोणताही पेशा आचरण्याचे स्वातंत्र<br>■ कोणताही व्यवसाय/व्यापार/धंदा चालविण्याचे स्वातंत्र<br>■ व्यापक अधिकार असून उपजीविकेच्या सर्व साधनांचा समावेश | १. काही पेश/व्यवसाय/व्यापारासाठी → व्यावसायिक/तांत्रिक पात्रता आवश्यक<br>२. राज्यसंस्थेचे स्वत:ची पूर्ण/अंशत: मक्तेदारी असणारे व्यवसाय-व्यापार<br>*(१ ली घ.दु., १९५१)* |

**कलम २०** — **अपराधांच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण**

| | २०(३) | २०(२) | २०(३) |
|---|---|---|---|
| | एक्स-पोस्ट-फॅक्टो कायद्याचा अंमल नाही | डबल जेपर्डी नसेल | स्वत:विरूद्ध साक्षिदार होण्याची सक्ती नसेल |
| **अर्थ** | प्रचलित कायद्याचा भंग केला तरच दोषी, प्रचलित कायद्याने सांगितलेल्या शिक्षेपेक्षा अधिक शिक्षा देता येणार नाही | एकाच अपराधासाठी एकापेक्षा अधिक वेळा खटला चालविला जाणार नाही व शिक्षा दिली जाणार नाही. | आरोपी व्यक्तीला स्वत:विरूद्ध साक्षिदार होण्याची सक्ती केली जाणार नाही. (मौखिक तसेच कागदपत्रीय साक्षीसाठी) |
| **मर्यादा** | १. केवळ फौजदारी कायद्यासाठी प्राप्त, दिवाणी व कर कायद्या-साठी नाही. (फौजदारी एक्स-पोस्ट-फॅक्टो कायद्यास मनाई, मात्र दिवाणी/कर एक्स- पोस्ट फॅक्टो कायद्यास संमती)<br>२. फौजदारी एक्स-पोस्ट-फॅक्टो कायद्यांतर्गत शिक्षा केली जाणार नाही, मात्र खटला चालविला जाऊ शकेल.<br>३. हा हक्क प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याबाबत उपलब्ध नाही. | हे संरक्षण केवळ न्यायालयासमोर/न्यायाधिकरणासमोर चालू असलेल्या कार्यवाही बाबतच प्राप्त होते, डिपार्टमेंटल चौकशी/प्रशासकीय अधिकाऱ्यासमोरील कार्यवाहीबाबत नाही. | पुढील सक्ती केली जाऊ शकेल:<br>१. गुन्हाशी संबंधित वस्तू सादर करणे,<br>२. बोटांचे ठसे, नमुना सही, रक्ताचा नमुना सादर करणे,<br>३. व्यक्तीने स्वत: हजर राहणे.<br>तसेच हे संरक्षण केवळ फौजदारी कार्यवाहीला लागू आहे, दिवाणी कार्यवाहीला नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| **मार्गदर्शक तत्वांबद्दलची मते** | 1. | **एन.एम.सिंघवी** | घटनेला जीवन प्रदान करणाऱ्या तरतूदी. |
| | 2. | **एम.सी.छगला** | या सर्व तत्वांची पूर्ण अंमलबजावणी झाल्यास देश पृथ्वीवरील स्वर्ग बनेल. |
| | 3. | **बी.एन.राव** | राज्यसंस्थेच्या प्राधिकारांसाठी नैतिक तत्वे, त्यांच्यात किमान शैक्षणिक मूल्य आहे. |
| | ४. | **ॲलन ग्लेडहिल** | शासनाला इतर काही गोष्टी करण्याबाबत विधायक सूचना |
| | ५. | **के. एम. पणणीकर** | आर्थिक क्षेत्रातील समाजवाद |
| | ६. | **अनंत नारायण** | अवाद्य, योग्य आणि अमूर्त |
| | ७. | **के.व्ही. राव** | भारताला पोलीसी राज्य नव्हे, तर कल्याणकारी राज्य बनविण्याचा हेतू. |
| | ८. | **डॉ. आंबेडकर** | आर्थिक लोकशाहीची तत्वे, नाविन्यपूर्ण वैशिष्ट्ये |
| | ९. | **ग्रॅनव्हिल ऑस्टिन** | मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे हे संविधानाचे अंतरात्मा आहेत. |

**मार्गदर्शक तत्वांची भूमिका**

1. न्यायालयांसाठी न्यायीक पुनर्विलोकनाच्या अधिकाराच्या प्रभावी वापरासाठी एक उपयुक्त दीपस्तंभ म्हणून कार्य करतात.
2. प्रास्ताविकेतील तत्वांचे विस्तारण करतात.
3. सत्ताबदल झाला तरी राजकीय, आर्थिक व सामाजिक धोरणांमध्ये स्थैर्य व सातत्यास प्रोत्साहन देतात.
4. नागरिकांच्या मूलभूत हक्कांना पूरक कार्य करतात. मूलभूत हक्कांच्या पूर्ण व योग्य उपभोगासाठी अनुकूल वाता-वरण निर्माण करतात.
5. सरकारच्या कामकाजाचे परीक्षण या तत्वांच्या आधारे करता येते.

| | | | |
|---|---|---|---|
| **मार्गदर्शक तत्वांवरील टिका** | १. | **गैर-न्यायप्रविष्ट** | नववर्षाचा निश्चय/कंटाळवाणा नैतिक उपदेश/भावनांची केराची टोपली |
| | २. | **अतार्किक रचना** | क्रम अयोग्य, महत्वाच्या व कमी महत्वाच्या तत्वांचे एकत्रिकरण, जुन्या व नव्या तत्वांचे मिश्रण, सातत्यपूर्ण तत्वज्ञानाचा अभाव |
| | ३. | **घटनात्मक संघर्ष** | केंद्र व राज्ये, राष्ट्रपती व पंतप्रधान, राज्यपाल व मुख्यमंत्री यांमध्ये. |

| | | | |
|---|---|---|---|
| **मार्गदर्शक तत्वांवरील टिकात्मक मते** | १. | **के.संथानम** | घटनात्मक संघर्ष |
| | २. | **एन. श्रीनिवासन** | अतार्किक रचना |
| | ३. | **टी. टी. कृष्णमाचारी** | भावनांची केराची टोपली |
